व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व शासकीय संस्था व कार्यालयांमध्ये HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली प्रभावीपणे राबविणे तसेच वेतनाशी संलग्न करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

०३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-०१

परिपत्रक क्र.-१६/व्यशिप्रशि/बायोमेट्रिक/२०१९/ई-गव्हर्नन्स/८३

दिनांक- १५ ऑक्टोंबर, २०१९

**वाचा:-**

Office Memorandum Minisitry of Personnel, Public Grievances & Pensions Department of Personnel & Training, GOI, dated- २१/११/२०१४.

**प्रस्तावना:-**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणे, सर्व मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी उपलब्ध करुन देणे, सर्व शासकीय तांत्रिक विद्यालयांमार्फत प्रशिक्षण देणे अशा प्रकारच्या वेगवेगळ्या योजना उपरोक्त संस्थांमार्फत राबविल्या जातात. प्रभावी लोकाभिमुख प्रशासनासाठी तसेच संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना अत्याधुनिक व नियमित प्रशिक्षण देण्याकरीता प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांना संस्था/कार्यालयात वेळेवर उपस्थित राहण्यासाठी व त्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बायोमेट्रिक उपस्थिती नोंदणी पध्दत लागु करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व शासकीय संस्था/ कार्यालयामधील अधिकारी / कर्मचारी कामकाजाच्या वेळेत उपलब्ध होत नसल्याचे तसेच मुख्यालयाच्या ठिकाणीही हजर रहात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. यासंदर्भात शासनाकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. या अनुषंगाने वेळोवेळी मुख्यालयी राहण्याबाबत तसेच संस्थां /कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी सुरु करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि त्यानुसार कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थ्यांना अत्याधुनिक व नियमित प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त आहे. तसेच शासकीय संस्थामध्ये उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा पुरेपुर वापर होणेही अनिवार्य आहे.

राज्यातील संस्था/ कार्यालय प्रमुख व इतर कर्मचारी शासकीय कामकाजाच्या वेळेत त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित नसणे, मुख्यालयी रहात नसणे व त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना योग्य प्रशिक्षण वेळेत प्राप्त न होणे, अशा प्रकारच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. ही बाब


Save Tree, Save Water, Save Life

या विभागास तसेच राज्यास निश्चितच भूषणावह नाही. सबब राज्यातील संस्था / कार्यालयांचा दर्जा सुधारण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय संस्थामधील उपलब्ध अधिकारी व कर्मचारी या मनुष्यबळाचा प्रभावीपणे व कार्यक्षमरित्या व्यवस्थापन आणि गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व संस्था/ कार्यालयांमध्ये HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली प्रभावीपणे व सक्षमपणे राबविण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई हे पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>परिपत्रक:-</u>

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व शासकीय संस्था व कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहणे, कामकाजाच्या वेळेत उपस्थित राहणे संदर्भात HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) राज्यातील सर्व शासकीय औ.प्र. संस्था/ कार्यालयांमधील उपलब्ध अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा प्रभावीपणे व कार्यक्षमरित्या व्यवस्थापन करुन गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व कार्यालये व संस्थांमध्ये HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली प्रभावीपणे व सक्षमपणे राबविण्यात यावी.

२) संचालनालय व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना सदर HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली बंधनकारक असुन त्याचा वापर कटाक्षाने होत आहे किंवा कसे याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित संस्था/ कार्यालय प्रमुखांची राहील.

३) सर्व संस्था व कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक प्रणाली ही त्या-त्या संस्था व कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली तसेच वेतनाशी जोडण्यात यावे व सदर कार्यवाही पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय/ संस्था प्रमुखांची राहील. HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली वेतनाशी संलग्न करुन वेतन काढण्याची दक्षता घ्यावी. HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली वेतनासोबत संलग्न केल्याशिवाय वेतन अदा करण्यात येऊ नये. अन्यथा तशी कार्यवाही न झाल्यास संबंधित कार्यालय प्रमुखांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर नियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

४) संबंधित संस्था व कार्यालयांमधील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणालीशी न जोडता संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन काढण्यात आल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्यावरही जबाबदारी

निश्चित करण्यात येऊन त्यांच्यावर नियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

५) सर्व संस्था व कार्यालयांची वेतन देयके संबंधित संस्था/ कार्यालयामार्फत जिल्हा कोषागारात सादर करताना सदर देयके HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविली याची खात्री करूनच कोषागारास देयके सादर करण्यात आलेली आहेत यासंदर्भात संबंधित संस्था/ कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित करावे.

६) सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक प्रणाली सुरू करण्यात येऊन त्याच्या अनुषंगाने दरमहा बायोमेट्रिक प्रणालीचे संनियंत्रण करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा दरमहा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या संबंधित प्रादेशिक प्रमुखांकडे त्यापुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सादर करावा. त्या पुढील सात दिवसात प्रादेशिक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयाचा तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयाचा अहवाल दरमहा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर करावा. विभाग प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयाचा व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालय व संस्थांचा एकत्रित अहवाल दर महिन्याच्या ३० तारखेस शासनास सादर करावा.

७) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविली याची खातरजमा करण्याबरोबरच त्यादिवशी त्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावा.

८) HRMS मोबाईल बेस्ड बायोमेट्रिक उपस्थिति दर्शविण्यासाठी कोणत्याही मोबाईल वरून उपस्थिती दर्शविता येईल.

राज्यातील सर्व संस्था/ कार्यालय प्रमुख तसेच प्रादेशिक प्रमुख आणि सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी उक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसे न केल्यास संबंधित अधिकारी हे शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

दीपेंद्र सिंह कुशवाह (भा.प्र.से.)
संचालक

प्रत:-

१) मा.अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/ नागपूर



Save Tree, Save Water, Save Life

३) सचिव, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे, मुंबई-५१

४) सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी / कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई-०१

५) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (प्रादेशिक कार्यालयामार्फत)

६) सर्व शासकीय औ.प्र.संस्था (प्रादेशिक कार्यालयामार्फत)

७) सर्व शासकीय तांत्रिक विद्यालय (प्रादेशिक कार्यालयामार्फत)

८) सर्व मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र (प्रादेशिक कार्यालयामार्फत)

९) संचालनालयातील सर्व कार्यासने

१०) सर्व संबंधित अधिकारी

११) निवड नस्ती.